# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. ०४ जानेवारी, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**जळगाव दि.०४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील कला,विज्ञान व वाणिज्य पदवी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत सत्र- २, ४ व ६ या सत्रातील बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन एमसीक्यु स्वरूपात उद्या दि. ५ जानेवारी पासून सुरू होत आहेत. १२ हजार ५६७ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.**

या परीक्षेसाठी वाणिज्य विद्याशाखाचे २ हजार ९५, व्यवस्थापनशास्त्राचे २१२, विज्ञानचे ६ हजार ५८०, कला व मानव्य विज्ञानचे ३ हजार ६७१ आणि सामाजिक कार्याचे ०९ असे एकूण १२ हजार ५६७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी असे परीक्षेचे स्वरूप असून पदवीस्तरावरील ६० गुणांच्या परीक्षेसाठी ९०मिनिटांचा कालावधी व ६० प्रश्न असतील यातील कमीत कमी ४० प्रश्न सोडवायचे आहेत.

ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना डेस्कटॉप/लॅपटॉप/स्मार्टफोनचा वापर करता येईल. या परीक्षांसाठी सर्व महाविद्यलयांमध्ये एकुण ४११ आयटी-समन्वयक नेमण्यात आलेले आहे. तांत्रिक व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता काय केले पाहिजे याच्या मार्गदर्शक सूचना परीक्षार्थींना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लॉगइन होण्यासंदर्भात माहिती देणारा व्हीडीओ अपलोड करण्यात आला आहे व माहिती पुस्तिका देखील देण्यात आली आहे. विद्यापीठाच्यावतीने सरावासाठी मॉकटेस्ट घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे व प्रवेशपत्रा (हॉलतिकिट) वरील विषयांप्रमाणे परीक्षा द्यावी.

विद्यार्थ्यांनी परीक्षा देतांना ऐनवेळी उदभवणाऱ्या कोणत्याही तांत्रिक व्यत्ययाची भीती बाळगू नये. कारण या विद्यार्थ्यांना विंडो कालावधी तीन तासाचा दिला जाणार आहे. परीक्षा देतांना ऐनवेळी वीज पुरवठा खंडीत झाला अथवा काही तांत्रिक व्यत्यय आला तर कसे होईल अशी भीती विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यादृष्टीकोनातून विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. बी.पी. पाटील यांनी काही तांत्रिक बाबींची माहिती विद्यार्थ्यांना दिली आहे. ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www:nmu.ac.in या संकेतस्थळावरील http://nmu.unionline.in या लिंक वर जाऊन URL वर क्लीक करावे त्याठिकाणी विचारण्यात आलेला User ID व PRN No. टाकावा. Password साठी विद्यार्थ्याची जन्मतारीख हीच विद्यार्थ्याचा Password आहे (उदा. 06/10/1999 ही जन्मतारीख असेल तर Password हा 061099 असा असेल). त्यानंतर Active Test वर क्लीक करून आपली विद्याशाखा (Faculty)

आणि Program Name निवडायचा आहे. तो क्लीक केल्यानंतर शेवटी Course Code/Subject Name हे आपल्या Hall Ticket वर दिल्याप्रमाणे निवडायचे आहे.

त्यानंतर परीक्षेसाठी विद्यार्थी Login होईल. Login यशस्वी झाल्यानंतर फोटो ओळखपत्राची पडताळणी होईल व या पडताळणी नंतर परीक्षेला प्रारंभ होईल. Login करतांना अयशस्वी झाल्यास विद्यार्थ्याने आपला Password हा बिनचूक आहे की नाही याची पडताळणी करावी. त्यानंतरही Login होत नसल्यास संकेतस्थळाच्या प्रशासकाशी परीक्षार्थी हा Chatbot द्वारे तात्काळ संपर्क  साधू शकतो. त्याच्या शंकेचे लगेच निरसन केले जाईल. त्यानंतरही हा प्रश्न सुटला नाही तर विद्यार्थ्याने Trouble Logging in चा पर्याय निवडावा त्यामध्ये विद्यार्थ्याने आपला PRN No. टाकावा विद्यार्थ्याच्या Reigstered केलेल्या मोबाईलवर OTP प्राप्त होईल. तो OTP टाकल्यानंतर विद्यार्थी परीक्षेसाठी Login होईल. हा पर्याय देखील यशस्वी झाला नाही तर विद्यार्थ्यांनी संबधित महाविद्यालयाच्या असलेल्या आय.टी. समन्वयकाशी तात्काळ संपर्क साधावा. त्या विद्यार्थ्याच्या शंकेचे निरसन केले जाईल. प्रश्नाचे उत्तर निवडताना A B C D समोरील रेडीओ बटनवर क्लिक करावे. या पध्दतीने परीक्षा दिली तर कोणती ही अडचण निर्माण होणार नाही. प्रश्नपत्रिका सोडवत असतांना वीज पुरवठा खंडीत झाला अथवा काही तांत्रिक व्यत्यय आला तरी विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा उर्वरीत कालावधी दिला जाणार आहे. परीक्षार्थींचा विंडो कालावधी तीन तासाचा असणार आहे. अशी माहिती श्री. बी.पी. पाटील यांनी दिली.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी